भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500

FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये

सत्यमेव जयते

Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2021 ◐ BM 996062

22 JUL 2022

अनु. क्र.: 46808 दि: ............ मु.शु. रक्कम: 500/-

दस्ताचा प्रकार: हमीपत्र

दस्त नोंदणी करणार आहेत का : होय / नाही

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव: रविंद्र पोपट गिरी

पत्ता: पिरंगुट मुळशी पुणे

दुसऱ्या पक्षकाराचे नाव: PMRDA Pune

हस्ते व्यक्तीचे नाव व पत्ता: गणेश साबळे पुणे.

वरिष्ठ कोषागार अधिकारी पुणे

18 JUL 2022

प्रथम मुद्रांक लिपीक कोषागार पुणे करिता

सौ. सुचेता सुहास देशपांडे

परवाना क्र. २२०१११८

१९२/२, बुधवार पेठ, पुणे.२

22 JUL 2022

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला आहे त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासुन ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

* हमिपत्र *

NOTARY
SHASHIKANT B. KURHADE
REGD. NO. 10476
PUNE CITY
EXPIRY OF COMMISSION 31/11/2023
GOVERNMENT OF INDIA

# हमीपत्र

हमीपत्र आज दिनांक    /    /२०२२ इसवी ते दिवशी ....

मी/आम्ही **मे . जी प्लास्ट इंडस्ट्रीज तर्फे 1) श्री. रवींद्र पोपट गिरी , वय ............ वर्षे , धंदा : व्यवसाय , रा . मौजे ; पिरंगुट , तालुका : मुळशी , जिल्हा : पुणे , व सौ. कविता शंकर गायकवाड वय ............ वर्षे , धंदा : व्यवसाय , रा . मौजे ; पिरंगुट , तालुका : मुळशी , जिल्हा : पुणे**. हमीपत्र लिहून देतो कि,

मौजे : आंबडवेट , तालुका : मुळशी , जिल्हा : पुणे . येथील गट नंबर ४६९/२ पैकी , क्षेत्र ४०००.०० चौ.मी. या मिळकतीमध्ये निवासी / बिगरनिवासी पद्धतीच्या प्लॉट चे बांधकामा बाबत प्रस्ताव जागा मालक / कुलमुखत्यारपत्र धारक म्हणून मी दाखल केलेला आहे. तूर्त या जागी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत कडून पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकत नाही, याची मला माहिती देण्यात आलेली असून याला पर्याय म्हणून जागेवरील बोअरवेल द्वारे पाणी उपलब्ध करून देण्याची अथवा टँकरद्वारा पाणी मिळण्याची व्यवस्था सोसायटी मार्फत करीत आहोत. त्या सांबांधी आवश्यक त्या वरिष्ठ भूवैज्ञानिक अधिकारी, भूजल सर्वेक्षण आणि विकास योजना (G.W.S. & D.A.) या कार्यालया मार्फत किंवा तत्सम तांत्रिक सल्लागारा मार्फत सदर जागी पाणी असल्याबाबतचे प्रमाणपत्र आणून देण्याची कार्यवाही करणे आमचेवर बंधनकारक राहील.

१. इमारत पूर्ण झाल्यावर इमारतीमधील निवासी/बिगरनिवासी वापरासाठी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत पिण्यासाठी पुरेसा पाणीपुरवठा पुरेश्या दाबाने करू शकत नसल्यास पाण्याची पर्यायी व्यवस्था प्रवर्तक या नात्याने इमारतीमधील रहिवाश्यांना मी करून देण्यास तयार असून त्याची सर्व जबाबदारी मी या हमीपत्राद्वारे स्वीकारत आहे.

२. पुणे महानगर प्रदेश क्षेत्रविकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत मार्फत कोणताही पाणीपुरवठा सुरु न झाल्यास किंवा अपुरा झाल्यास मी कोणत्याही कोर्टाकडे याबाबतीत दावा दाखल करणार नाही.

३. निवासी आगर व्यापारी गाळ्यांचे विक्रीचे बुकिंग करताना येणाऱ्या करारनाम्यामध्ये पाणीपुरवठ्याची वरीलप्रमाणे सर्व वस्तुस्थिती विशेष बाब म्हणून नमूद करून घेण्याची जबाबदारी माझेवर राहील. जागेवरील परिस्थितीची जाणीव नोयोजित गाळा धारकांना करून दिल्यानंतर सुद्धा या ठिकाणी होणाऱ्या बुकिंग नंतर होणाऱ्या नियोजित गाळे धारकांना पाणी पुरवठा अपुरा झाला तर पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत चा पुरेसा पाणीपुरवठा होईपर्यंत माझ्या खर्चाने पुरेसा पाणीपुरवठा करून देण्याची माझी जबाबदारी राहील. पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत याना त्याबद्दल तोशिष लागू देणार नाही.

४. टँकरद्वारा किंवा बोअरवेलद्वारा सध्या मिळणाऱ्या पाण्याचे नमुने वेळोवेळी प्रयोगशाळेतून तपासून आणणे व त्या रिपोर्ट नुसार पाणी योग्य आढळल्यास पाणी वापरण्यात येईल, याची मी काळजी घेईल.

५. सदरची योजना संपूर्णरीत्या प्रवर्तक / मालक या नात्याने मी अन्य कोणास भविष्यकाळात विकल्यास नवीन मालक / प्रवर्तकास या हमीपत्रातील सर्व बाबींची लेखी कल्पना देईल. त्याचा समावेश नवीन करारनाम्यात करण्यात येईल याची काळजी मी घेईल.

६. हे हमीपत्र माझे वाली वारसांवर बंधनकारक राहील.

७. सदर प्लॉटमधील संदर्भातील कोणत्याही होणाऱ्या करारामध्ये या हमीपत्राचा समावेश करण्यात येईल, व हे हमीपत्र करारनाम्यातिला विशेष बाब म्हणून समजण्यात येईल.

वरील हमीपत्र मी राजीखुशीने दिनांक / /२०२२ रोजी लिहून दिले असे.

ठिकाण : पुणे

दिनांक: / /२०२२

**हमीपत्र लिहून देणार**

**मे. जी प्लास्ट इंडस्ट्रीज तर्फे**

**श्री. रवींद्र पोपट गिरी**

**सौ. कविता शंकर गायकवाड**

NOTARY
SHASHIKANT B. KURHADE
REGD. NO. 10476
PUNE CITY
EXPIRY OF COMMISSION 3/11/2023
GOVERNMENT OF INDIA

BEFORE ME

Shashikant B. Kurhade
Notary Govt. of India

Noted and Registered
at Sr. No. B-2704/2022
Date:- 17 AUG 2022

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL